**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, .....

**सभापती** : मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजपासून सभागृहाच्या कामकाजाचे लाईव्ह प्रक्षेपण सुरु झालेले आहे, याची सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. सन्माननीय विरोधी पक्ष नेते बोलण्याची परवानगी मागत असल्यामुळे मी त्यांना प्रथम संधी देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. काल रोजीची आणि आजची महत्त्वाची बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे. विदर्भातील वर्धा जिल्हयातील काही शेतकऱ्यांनी शासनाकडे तसेच तेथील जिल्हा प्रशासनाकडे आत्महत्या करण्याची परवानगी मागितली आहे. या राज्यातील शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट ओढवल्यानंतर शासनाने प्रथम शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या संदर्भात घोषणा करण्याची आवश्यकता आहे. या सरकारला आमच्या शेतकऱ्यांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. हे सरकार जे काही वेगवेगळे निर्णय घेत आहे त्याच्याशी आमचे काही देणे घेणे नाही. एलबीटीच्या संदर्भात हे सरकार दर वर्षी नगरपालिकांना 6 हजार कोटी रुपये देणार असून त्यालाही आमचा विरोध नाही. आज महाराष्ट्रातील शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडल्यामुळे शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना संकटाच्या काळात मदत करण्याची आवश्यकता असून त्यासाठी शासनाने शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा या सभागृहात प्रथम करण्याची आवश्यकता आहे. शासनाने प्रथम शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची घोषणा या सभागृहात करण्याची आवश्यकता आहे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

आज राज्यातील शेतकरी संकटात सापडल्यामुळे तो प्रशासनाकडे आत्महत्या करण्याची परवानगी मागत आहे. वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांनी तसेच तेथील महिला शेतकरी भगिनींनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आत्महत्येची परवानगी मागितली आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली आहे की, आम्ही शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही. ज्यावेळेस ही घोषणा महाराष्ट्रातील अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनी ऐकली, वाचली तेव्हापासून महाराष्ट्रातील

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

शेतकरी प्रशासनाकडे आत्महत्या करण्याची मागणी करु लागले आहेत. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून या शासनाला विनंती आहे की, आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या सरकारने कर्जमाफीची घोषणा अगोदर करुन राज्यातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा. हे सरकार ज्या शेतकऱ्याच्या मतावर सत्तेवर आले त्याच शेतकऱ्यांच्या विरुध्द हे सरकार धोरण अवलंबीत असेल तर या राज्यातील शेतकऱ्यांनी कोणाकडे पहायचे ? माझी आपल्याला विनंती आहे की, या सरकारने आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून अगोदर कर्जमाफीची घोषणा करावी व त्यानंतर या विषयावर चर्चा करण्याची आपण परवानगी द्यावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आज राज्यातील शेतकऱ्यांवर भीषण परिस्थिती ओढवलेली असल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, यासाठी आम्ही महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असून त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज राज्यातील शेतकरी मोठया प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. काल एकटया यवतमाळ जिल्हयात 3 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने सुध्दा माहिती घेतलेली आहे. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आणि शेतकऱ्यांना कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकरी आपली शेती कसू शकत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. एका शेतकऱ्याने तर बैलजोडी आणि औतफाटा विकून बी-भरण करुन पेरणी केली. परंतु पाऊस न पडल्यामुळे आता राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवल्यामुळे शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत. दुबार पेरणीचे संकट राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले असताना आज राज्यातील शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज सुध्दा मिळू शकत नाही अशी परिस्थिती आहे. या शासनाने राज्यातील केवळ 30 टक्के शेतकऱ्यांनाच कर्ज दिलेले आहे. या निमित्ताने आमची आपल्या माध्यमातून शासनाकडे एकच मागणी आहे की, राज्य शासनाने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे ......

सभागृहात प्रथम करण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या संदर्भात महसूल मंत्र्यांनी चर्चा करण्यास सरकार तयार आहे अशी भूमिका व्यक्त केली आहे. आम्ही सुध्दा या विषयावर चर्चा करण्यास तयार आहोत, परंतु शासनाने प्रथम शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली तरच आम्ही या विषयावर चर्चा करु. माननीय मुख्यमंत्र्यांनी चहा-पाण्याच्या पत्रकार परिषदेत जाहीर केले होते की, शासन शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ शकणार नाही. आम्ही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात महाराट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. असे असताना जर शासन शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नसेल तर आम्ही कोणत्या आधारावर चर्चा करावयाची ? या विषयावर चर्चा सुरु करावयाची असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनात येऊन सांगितले पाहिजे की, आम्ही शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी देऊ. शासनाने प्रथम कर्जमाफीची घोषणा केली तरच आम्ही या विषयावर चर्चा करु. परंतु केवळ कोरडी चर्चा करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम आम्ही कदापिही सहन करणार नाही. त्यामुळे या सदनात मुख्यमंत्र्यांनी येऊन राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाईल असे जाहीर केले तरच आम्ही चर्चेला सुरुवात करु. जोपर्यंत शासन शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा करीत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सत्ताधारी पक्षाकडून शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**सभापती :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.07 ते 12.17 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. या विषयावर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. यामध्ये विरोधकांना राजकारण करावयाचे आहे. राज्यावर 3 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. या कर्जावर राज्याला 24 हजार कोटी रुपये व्याज भरावे लागत आहे. आमच्या काळातील नव्हे तर तुमच्या काळातील पाप फेडावयाचे आहे. कर्जमाफीचा प्रश्न चर्चेद्वारे सुटू शकतो. सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे. विरोधकांना चर्चा नको. आम्ही शेतकऱ्यांसाठी काय करीत आहोत हे विरोधकांना दाखवावयाचे आहे. सरकार कर्जबाजारी आहे. सरकारवर 3 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. मागील कालखंडातील अनुभव असा आहे की, कर्जमाफी केल्यानंतर त्याचा सर्वलाभ पश्चिम महाराष्ट्राला झालेला आहे. विदर्भ व मराठवाड्याला कोणताही लाभ झालेला नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यास आम्ही तयार आहोत. हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे आहे. परंतु तत्कालीन सरकारने इतक्या ठिकाणी घाण करुन ठेवली आहे ती स्वच्छ करण्यास आम्हाला वेळ लागणार आहे. तेव्हा आपण चर्चेला सुरुवात करावी. सरकारची उत्तर देण्याची तयारी आहे.

**तालिका सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश्य परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.19 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री शेतकऱ्यांना कर्जमाफी न देण्याबाबतचे आपले वक्तव्य मागे घेत असतील तर....(गोंधळ) सभापती महोदय, आमची मागणी आहे की, शेतकऱ्यांना कर्जमाफी न देण्याबाबत सरकारने केलेले वक्तव्य अगोदर मागे घेतले पाहिजे. त्यानंतरच....

**तालिका सभापती** (प्रा.जनार्दन चांदूरकर) : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे, मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.16 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे. मला आपण दिलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत निर्णय द्यायचा आहे.

आज दिनांक 14 जुलै, 2015 रोजी सर्वश्री माणिकराव ठाकरे, शरद रणपिसे, संजय दत्त, भाई जगताप, वि.प.स. यांनी सकाळी 09.05 वाजता तसेच सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जयंत पाटील, संजय दत्त, कपिल पाटील, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी सकाळी 09.06 वाजता "राज्यामध्ये पावसाळा सुरु होऊन दीड महिना झाला तरीही सरासरीच्या 10 टक्केही पाऊस न होणे, कमी पावसामुळे खरीपाची पेरणी वाया जाऊन दुबार पेरणीचे संकट निर्माण झालेले असणे, गेल्या तीन वर्षांपासुनच्या दुष्काळासोबतच गारपीट व अवकाळी पावसामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती तसेच राज्यात आठ महिन्यांत 1800 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली असणे, दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी शासनाकडून मदत न मिळणे, मंजूर झालेल्या पीक विम्याची भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापपर्यंत जमा न होणे, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

त्याचप्रमाणे आज दिनांक 14 जुलै, 2015 रोजी सकाळी 10.32 वाजता सर्वश्री माणिकराव ठाकरे, भाई जगताप, संजय दत्त, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी नियम 289 अन्वये याच विषयावर सूचना दिलेली असून या सुचनेमध्ये त्यांनी "माननीय मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी करता येणार नाही अशी घोषणा करणे, त्यामुळे राज्यातील देशोधडीला लागलेल्या शेतकऱ्यांच्या जीवाशी हे सरकार खेळत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये पसरल्याने राज्यातील बेचिराख झालेल्या शेतकऱ्यांना सुस्थितीत आणण्यासाठी संपूर्ण कर्जमाफीची घोषणा करण्यात यावी." असा विषय नमूद केला आहे व यासाठी सभागृहाचे कामकाज व प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून या विषयावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा अशी या सर्व सुचनांद्वारे विनंती करण्यात आली आहे. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

काल दिनांक 13 जुलै, 2015 रोजी याच विषयावर याच सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये सूचना दिली होती. तरी मी ती मंजूर केलेली नव्हती.

आजच्या सुचनेतील विषय पाहता याच विषयावर सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आज कार्यक्रमपत्रिकेमध्ये समाविष्ट केलेला आहे. कर्जमाफीचा मुद्दा सोडता बरेचसे विषय सारखेच असल्याचे दिसून येते. तथापि विषयाचे महत्त्व, गांभीर्य व शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची परिस्थिती पाहता या विषयावर सभागृहामध्ये सखोल चर्चा होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

तांत्रिकदृष्ट्या नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना मी फेटाळत आहे. पुढील कामकाज सुरू करावे.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(गोंधळ)

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवतो.

(अनेक माननीय मंत्री उभे राहून बोलत असतात.)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात.)

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(गोंधळ)

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(अनेक माननीय मंत्री उभे राहून बोलत असतात.)

डॉ. रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारतीय संविधान अनुच्छेद 213 2(क) अन्वये सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 9 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2015 सभागृहासमोर ठेवतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात.)

श्री. विजयकुमार देशमुख (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारतीय संविधान अनुच्छेद 213 2(क) अन्वये सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 8 - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अध्यादेश, 2015 सभागृहासमोर ठेवतो.

(गोंधळ)

डॉ. रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(गोंधळ)

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

(अनेक माननीय मंत्री उभे राहून बोलत असतात.)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात.)

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(गोंधळ)

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(अनेक माननीय मंत्री उभे राहून बोलत असतात.)

डॉ. रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 9 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2015 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात.)

श्री. विजयकुमार देशमुख (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 8 - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अध्यादेश, 2015 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

(गोंधळ)

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 10 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 9 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 7 - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार व पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 14 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : सन 2015-16 च्या पूरक मागण्या सादर करणे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2015-16 च्या पूरक मागण्या सभागृहापुढे सादर करतो आणि तसे करीत असताना, आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 व 203 (3) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2015-16 च्या पूरक मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती :** सन 2015-16 च्या पूरक मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाव्दारे वितरीत करण्यात येत आहेत.

----------

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**सभापती :** चला आता विरोधी पक्ष नेते बोला.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतक-यांची कर्जमाफी करण्याची घोषणा करावी, अशी विनंती मी सरकारला करु इच्छितो. सभागृहात अन्य कामकाज घेण्यापूर्वी शासनाने कर्जमाफी जाहीर करावी, अशी आमची मागणी आहे. परंतु, तत्पूर्वी शासनाकडून अध्यादेश पटलावर ठेवण्यात आले. तसेच, पुरवणी मागण्या देखील मांडण्यात आल्या आहेत, हे बरोबर नाही. राज्यमंत्री महोदयांनी पुरवणी मागण्या देखील सभागृहासमोर मांडल्या आहेत. असे असेल तर त्या मताला टाकाव्यात.

**सभापती :** वेलमध्ये आलेल्या सन्माननीय सदस्यांनी अगोदर आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही शासनावर विश्वास ठेवला. परंतु, अशा प्रकारे लोकशाहीमध्ये जर आमचा गळा दाबला जात असेल, सामान्य माणसाचा गळा दाबला जात असेल तर ते बरोबर नाही. सरकारने अगोदर कर्जमाफीची घोषणा करावी. सभागृहाचे कामकाज सुरु झाल्याच्या पहिल्या क्षणापासून आम्ही अशी मागणी करीत आहोत की, सरकारने अगोदर राज्यातील मरत असलेल्या शेतकऱ्यांकडे लक्ष द्यावे. अगोदर कर्जमाफीची घोषणा करावी आणि नंतर अन्य कामकाज करावे. हे सर्व कामकाज करण्यासाठी आम्ही तयार आहोत. परंतु, सभागृहात आमचे बहुमत असताना, अन्य कामकाज घेण्याला सभागृहात विरोध होत असताना, आपल्या सर्वांसमक्ष असे घडत असेल तर ते बरोबर नाही. या गोष्टीचा आपण विचार करावा आणि निदेश द्यावेत. तेवढा आदर आपल्या आसनाला आहे. अगोदर शेतकऱ्यांबाबतचा निर्णय झाला पाहिजे. आपणही शेतकऱ्यांचे कैवारी आहात. परंतु, अशा प्रकारे कामकाज रेटण्याचा प्रयत्न केला गेला आहे. ज्या प्रकारे शासनाने हे कामकाज उरकून घेण्याची कार्यवाही केली आहे, तशीच कार्यवाही शासनाकडून आत्महत्या करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या शेतकऱ्यांबाबत झाली पाहिजे. हा अन्याय आहे. राज्यातील शेतकरी आपल्या सर्वांकडे पहात आहेत. आपण या आसनावरुन निदेश द्यावेत, अशी आमची मागणी आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, एकाच वेळी चार-चार मंत्री महोदय उभे राहून अध्यादेश पटलावर मांडण्याचे कामकाज करीत होते, हे बरोबर आहे का ?

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही. त्यांनी खाली बसावे. या उच्च सभागृहाच्या प्रथा, परंपरा आपण मोडू नका, असे मी तुम्हाला निदेश देतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, काल पावसाळी अधिवेशनाचे सत्र सुरु झाले. या अधिवेशनाला आपण पावसाळी अधिवेशन असे म्हणतो. परंतु, गेल्या 20 दिवसात पावसाचा एकही थेंब उभ्या महाराष्ट्रात पडलेला नाही. महाराष्ट्रातील बळीराजाचे, शेतकऱ्याचे सारे लक्ष सभागृहाकडे लागले आहे. सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला काही तरी मिळेल, अशी राज्यातील तमाम शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. या विषयावर चर्चा करण्याअगोदर कालही आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. काल सभागृहात शोक प्रस्ताव होता, याचीही आम्हाला जाणीव आहे. आजही आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सभागृहाच्या नेत्यांनी आपल्या भाषणात आघाडी सरकारने घेतलेल्या कर्जाचा उल्लेख केला आहे आणि तो रेकॉर्डवर आहे. मी त्यांना असे विचारु इच्छितो की, हे सरकार किती दिवस कर्जाचे भांडवल करणार आहे ? युतीचे शासन सत्तारुढ झाल्यानंतर या सरकारने देखील 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. त्यामुळे मागील कर्जाबाबत या सरकारला बोलण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बोलत असताना सभागृहाचे नेते त्यांना असे सांगत होते की, आता दुसरा विषय काढा. त्यांना नेमका कोणता विषय अभिप्रेत आहे ? त्यांना चिक्कीचा विषय अभिप्रेत आहे की, बोगस डिग्रीचा विषय अभिप्रेत आहे की, आणखी कोणता विषय अभिप्रेत आहे ? त्यांना अभिप्रेत असेल तो विषय त्यांनी सांगावा. सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात बोलत होते, एवढे तरी गांभीर्य असावयास हवे. यापूर्वी सन्माननीय श्री.विनोद तावडेजी, श्री.दिवाकर रावतेजी यांनी देखील विरोधी पक्ष नेते किंवा गटनेते म्हणून भाषणे केली आहेत. तुम्हीही अशी मागणी करीत आला आहात की, सरकारच्या वतीने पहिल्यांदा घोषणा झाली पाहिजे, मग आम्ही चर्चा करु हा मुद्दा कोठुन आला ? चहापानावर आम्ही बहिष्कार टाकल्यानंतर माननीय मुख्यमंत्री

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

यांनी पत्रकार परिषद घेतली आणि दावा करुन सांगितले की, महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येणार नाही, किंबहुना, देणार नाही, असे ते म्हणले. एक तर सभागृहाचे कामकाज सुरु होण्याअगोदर अशी घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी करणे हा या सार्वभौम सभागृहाचा हक्कभंग आहे. पण त्या बाबतीत आम्ही बोलत नाही. परंतु, काही तरी संवेदना दाखवा. ज्या संवेदनांबद्दल येथे बोलून तुम्ही टिकाटिप्पणी करीत आला आहात. काही अपेक्षा समोर ठेवून महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला सत्तेवर बसविले आहे. "अच्छे दिन आयेंगे", असा वादा तुम्ही केला आहे. (गोंधळ) हिम्मत असेल तर लोकांमध्ये जा. तुम्हाला लोकांच्या भावना कळतील. सन्माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांना नक्कीच कळेल. तुम्ही काळजी करु नका. जो मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त मांडू पहात होते तसेच सन्माननीय गट नेते श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्यावर चर्चा होण्याची आवश्यकता असताना आपण कागदपत्रे मांडण्यास परवानगी दिली. एकाच वेळी चार-चार मंत्री उभे राहतात, ही सभागृहाची कोणती पध्दत आहे ? पुरवणी मागण्यांबाबत आम्ही समजू शकतो. सभागृहात आमचेही बहुमत आहे. असे असेल तर पुरवणी मागण्या किंवा इतर विषयांवर आपण मतदान घ्यावे, अशी मागणी करण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...........

(...अडथळा...) माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब तुम्ही सभागृहाचे नेते आहात. आपण एवढे चिडू नका हो, संवेदनशीलता दाखवा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही पुरवणी मागण्यांसाठी तयार होतो. ज्या पद्धतीने खालच्या सभागृहातही दादागिरीने चालू आहे, विधानसभेत देखील दादागिरीने विरोधी पक्षाचा आवाज दाबला जातो, हे बरोबर नाही.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय,........

श्री.सुनील तटकरे : तुम्ही सभागृहाचे नेते आहात.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब, तुम्ही माझ्याकडे बघून बोला.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्यांना खाली बसवा.

**सभापती :** माननीय श्री.खडसे साहेब, एक मिनिट. आपण बोलावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहाच्या नेत्यासारखे वागले पाहिजे, विरोधी पक्षनेते म्हणून नाही. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, तुम्ही जरा डोक्यावर बर्फ ठेवावा. सभागृहाचे कामकाज तुम्हालाही चालवायचे आहे आणि आमच्या सहकार्याने चालवायचे आहे, याची जाणीव मनामध्ये ठेवा. असेच बोला, परंतु मेहरबानी करून शांतपणे बोला. तुम्हाला आवाज वाढवता येईल, आम्हालाही दसपटीने आवाज वाढवता येईल. म्हणून विनाकारण अशा पध्दतीने बोलू नका. सभागृहाची शान सभागृहाच्या नेत्यांनी ठेवली पाहिजे.

**सभापती :** माननीय श्री.खडसे साहेब, त्यांना बोलू द्यावे.

श्री.सुनील तटकरे : श्री.चंद्रकांत पाटील साहेब तुम्हीही शान ठेवा, तुम्हालाही तेच सांगणे आहे. शेवटी, सभागृह, सभागृहाच्या पद्धतीने चालले पाहिजे. सभागृहाच्या नेत्यांनी खरे तर विनंतीपर पद्धतीने बोलण्याची आवश्यकता असते. ते जर का अरेरावीच्या भाषेत बोलणार असतील तर हे सभागृहात खपवून घेतले जाणार नाही, हे सुध्दा आम्ही आवर्जून सांगत आहोत. आम्हाला याची जाणीव आहे, आम्ही सरकारमध्ये 15 वर्षे काम केलेले आहे. म्हणून (....अडथळा....) तुम्ही लावलेली वाट दिसते आहे, या सार्वभौम सभागृहात वाट लावल्याचे दिसते आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** तुम्ही माझ्याकडे बघून बोला.

श्री.सुनील तटकरे : तुमची अवकात आता दिसते आहे लोकांसमोर. माझा मुद्दा एवढाच आहे की, तांत्रिक बाब होती, त्या संदर्भात दालनात जे ठरले असेल त्याचा उल्लेख आपण करीत नसतो. सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी याबाबतीत विनंती केली होती. सभागृहातील इतर कामकाज हे आम्हाला मंजूर नाही. (...अडथळा...) बिलकुल मंजूर नाही. याबाबतीत योग्य निर्णय आपल्याकडून घेतला जावा, एवढीच नम्रतेची विनंती आहे आणि महाराष्ट्रामध्ये जोपर्यंत कर्जमाफीची घोषणा होत नाही तोपर्यंत जर आपण याच पद्धतीने कामकाज करणार असू तर एकही कामकाज चालवू दिले जाणार नाही, हाही इशारा विरोधी पक्षाच्या माध्यमातून आपल्याला देवू इच्छितो आहे.

**सभापती :** सन्माननीय गट नेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी आता बोलावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,.....

**सभापती :** श्री.माणिकराव ठाकरे एक मिनिट...

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण परवानगी दिल्याशिवाय ते मध्येच उठून बोलत आहेत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आणखी किती वेळ बोलणार आहेत ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही किती बोलणार हे महत्वाचे नाही तर मला जोपर्यंत सभापती महोदयांनी परवानगी दिली आहे, तोपर्यंत मी बोलणार आहे. तुम्ही कोण सांगणार की मी किती वेळ बोलायचे ?

**सभापती** : मी सांगितले आहे त्या निदेशाला आपण कुठे तरी मान द्यावा. फक्त 5 मिनिटे थांबा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आज संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांची वाईट अवस्था झालेली आहे. पावसाळी अधिवेशनात शेतकऱ्यांना न्याय मिळेल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील, अशा अपेक्षेने राज्यातील शेतकरी आपल्याकडे बघत आहेत. माननीय विरोधी पक्षनेते

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.......

आणि आम्ही अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहासमोर असलेले कामकाज बाजूला ठेऊन शेतकऱ्यांच्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नासंबंधी शासनाने घोषणा करावी, अशी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सुचनेच्या माध्यमातून आग्रहाची मागणी करीत आहोत. आपण लोकप्रतिनिधी म्हणून येथे बसलो आहोत. आज शेतकऱ्यांच्या प्रश्नापेक्षा आणखी दुसरा कोणता महत्वाचा विषय असू शकतो ? अधिवेशन सुरु असताना राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असतील आणि दिवसेंदिवस आत्महत्यांचे प्रमाण वाढत असेल, 70 टक्के शेतकरी कर्ज न मिळाल्यामुळे व्यथित झाले असतील तर अशा वेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नापेक्षा राज्यात दुसरा कोणताही प्रश्न महत्वाचा असू शकत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळावा, अशी आम्ही मागणी करीत आहोत. स्थगन प्रस्तावाचे जे आयुध आमच्याकडे आहे, त्या माध्यमातून आम्ही ही मागणी करीत आहोत. परंतु, माननीय मुख्यमंत्री अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानाच्या वेळी पत्रकार परिषदेमध्ये सांगतात की, आम्ही अशा प्रकारे कर्जमाफी देणार नाही. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्री यवतमाळ जिल्ह्यातील एका गावात आले होते. आम्हाला अशी अपेक्षा होती की, मुख्यमंत्री महोदयांनी त्या गावातील शेतकऱ्यांना विश्वास दिल्यामुळे त्यांना दिलासा मिळेल आणि त्या गावातील शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. परंतु, ज्या शेतकऱ्याच्या घरी मुख्यमंत्री महोदय थांबले आणि "मी तुझ्या पाठीमागे आहे," असे सांगून त्यांनी ज्या शेतकरी महिलेच्या डोक्यावरुन हात फिरविला त्याच शेतकरी महिलेने तीन महिन्यानंतर "मला कर्ज मिळाले नाही, मला मदत मिळाली नाही," असे सांगून शासनाच्या विरोधात आत्महत्या केली. ज्या महिलेच्या डोक्यावर मुख्यमंत्र्यांनी हात ठेवला त्याच महिलेने नंतर आत्महत्या केल्यामुळे राज्यातील जनता मुख्यमंत्री महोदयांवर विश्वास ठेऊ शकत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी सांगितले की, आम्ही अशा प्रकारे शेतकऱ्यांना मदत करणार नाही, कर्जमाफी करणार नाही. मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी कॉंग्रेस पक्ष सत्तेवर होता त्यावेळी एकदा नाही तर दोन वेळा कर्जमाफी दिली होती. माननीय कृषी मंत्री सभागृहाला आकडवारी वाचून दाखवीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, सन 2009 मध्ये आमच्या युपीए शासनाने देशातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, ती आकडेवारी त्यांनी सांगावी. मी आपल्याला यवतमाळ



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.......

जिल्ह्यातील आकडेवारी सांगतो. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुसऱ्या वर्षी 1 हजार 15 कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले. आपण शेतकऱ्यांना किती कर्ज दिले, हे सांगावे. आमचा विषय असा आहे की, जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. आम्ही शेतकऱ्यांकरिता मागणी करीत आहोत. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. म्हणून शासनाने सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली पाहिजे. कारण, मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही कर्जमाफी देणार नाही आणि आज सभागृहाचे नेते आम्हाला सांगत आहेत की, या विषयावर चर्चा करावी. आम्ही कशाच्या आधारावर चर्चा करायची, पोकळ चर्चा करायची काय ? कर्जमाफी देणारच नाही, असे सांगितल्यानंतर आम्ही कशाच्या आधारावर चर्चा करायची ? आमची मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात यावे, त्यांचे शब्द मागे घ्यावेत, मी कर्जमाफी करण्यास तयार आहे, त्यामुळे आता सभागृहाने चर्चा करावी, असे सांगावे. मग आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. आमची मागणी वेगळी असताना शासनाने कुरघोडी करण्याचा प्रयत्न करणे......

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपले बोलणे आता पूर्ण करावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, सुनील तटकरे यांनी पुरवणी मागण्यांबाबतचा मुद्दा मांडला आहे. त्या संदर्भात आपण जरूर विचार करावा. सभागृहात आपण कामकाज पुकारीत होता. परंतु, मंत्री महोदय वेगळ्याच कागदपत्रांचे वाचन करीत होते. एकात एक विषय येत होते. म्हणून आपण या संपूर्ण कामकाजाची प्रोसिजर एकदा तपासून पहावी आणि जे चुकीचे असेल ते कामकाजातून काढले पाहिजे.

सभापती महोदय, कर्जमाफीची घोषणा झाल्याशिवाय आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही, असे मी ठामपणे सांगतो. शासनाला कर्जमाफी करावीच लागेल. शासनाने कर्जमाफीची घोषणा करावी, अशी आमची मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे शांतपणे ऐकलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे यांनी भाषणे केली. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जे भाषण केले त्याचे मी स्वागत करतो. कारण, सन 2002 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची जी सुरुवात झाली ती त्यांच्या जिल्ह्यापासून झाली आणि त्यांच्याच कालखंडात यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत गेले. त्यावेळी ते या संदर्भात कधी काही बोलले नाहीत. परंतु, आता बोलत आहेत, याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. कारण, त्यांच्याच कालखंडात यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या. त्यावेळी त्यांच्याच पक्षाचे सरकार सत्तेवर होते. मागील 15 वर्षात त्यांनीच हे अनुभवले आणि आता मात्र बोलत आहेत. मी त्यांच्या बोलण्याचे स्वागत करतो. मुख्यमंत्री महोदयांनी "देणारच नाही", असे म्हटले नव्हते. "देता येणार नाही", असे म्हटले होते. कोणतेही प्रश्न चर्चेच्या माध्यमातून सोडविता येतात. निव्वळ राजकारणासाठी जर असे करायचे असेल तर मला माहिती आहे की, मागील वेळी कर्जमाफी होत असताना पश्चिम महाराष्ट्रात कर्जमाफी झाली. तुमच्या बँका तुम्ही भ्रष्टाचाराने डबघाईला आणल्या आणि त्यासाठी आम्हाला पैसा द्यावा लागला. निव्वळ तुमचा भ्रष्टाचार खपविण्यासाठी त्या बँकांनी कर्जमाफीची मदत घेतली. विदर्भात आणि पश्चिम महाराष्ट्रात किती कर्जमाफी झाली याची आकडेवारी मी देणार आहे. तुमच्या सूतगिरण्या, तुमच्या बँका या सर्व भ्रष्टाचारामुळे बुडविल्या आणि त्यासाठी तुम्ही त्या कर्जमाफीचा उपयोग करून घेतला, त्यासाठी तुम्हाला कर्जमाफी हवी आहे, शेतकऱ्यांसाठी नाही. मागील 15 वर्षात जे तुमचे धोरण होते त्या धोरणाचा परिणाम आता दिसत आहे. एका दिवसात शेतकरी आत्महत्येकडे वळला नाही. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, चर्चेद्वारे प्रश्न सुटतील.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.एकनाथराव खडसे....

याबाबत चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य चर्चा करावयाची नाही असे अगोदरच ठरवून आले असतील तर त्यांना चर्चा करण्यात रस नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात रस नाही असे दिसते. मागील सरकारने केलेले पाप महाराष्ट्रातील जनतेला आता भोगावे लागत आहे.

**सभापती** : कामकाज पत्रिकेवरील उर्वरित सर्व कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे, बुधवार दिनांक 15 जुलै, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 40 मिनिटांनी बुधवार दिनांक 15 जुलै, 2015 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION